# श्रीमती कोकिळाबाई महिला महाविद्यालय,दर्यापूर.

## जि. अमरावती सत्र 2019 – 2020

## नियमित कार्यक्रम अहवाल

दि. 21 / 06 / 2019

आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या निमीत्तीने विद्यार्थ्यांच्या आरोग्य संवर्धनच समृध्दी करीता मानवाच्या जीवनामध्ये योगाचे महत्व या विषययावर आमच्या महाविद्यालयातील शारिरीक शिक्षण संचालक प्रा.संजय पवार यांनी प्रात्यक्षिक करून उद्बोधन केले.या प्रसंगी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनींना योगाचे काही प्रात्यक्षिक आभासी पध्दतीने सादर केले.

दि. 27 / 06 / 2019

राष्ट्रीय सेवा योजनेतील विद्यार्थ्यांनींचे नामांकन करून घ्येण्यासंदर्भात मार्गदर्शन करण्यात आले. या प्रसंगी महाविद्यालयातील रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ. हरिदास आखरे.यांनी विद्यार्थ्यांनींना रासेयोची सविस्तर माहिती दिली व स्वयंप्रेरणेने विद्यार्थ्यांनींना या कार्यक्रमामध्ये सहभागी होण्याकरीता प्रोत्साहित केले.

दि. 28 / 07 / 2019

रासेयोच्या विद्यार्थ्यांनींच्या हस्ते समतोल राखण्यासाठी महाविद्यायलयीन परिसरात 50 रोपटयांची लागवढ करून सहभागी सर्व विद्यार्थ्यांनींना महाविद्यायलयाचे प्राचार्य डॉ.अबिनाश चौंखडे यांनी वृक्ष संवर्धनाचे महत्व पटवून दिले.

दि. 01 / 08 / 2019

लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची पुण्यतिथी व अण्णासाहेब साठे यांची जयंती प्राचार्य डॉ. अविनाश चौंखडे यांच्या अघ्येक्षतखाली साजरी करण्यात आली. कार्यक्रमाला प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ. अविनाश चौंखडे यांच्या अध्यक्षतेखाली साजरी करण्यात आली. कार्यक्रमाला प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ.जी.जी.हेरोळे हे होते. तसेच प्रमुख अतिथी म्हणुन प्रा.दिलीप मोरे यांनी यावेळी आपले विचार आभासी पध्दतीने व्यक्त केले.

दि. 11 / 08 / 2019

स्वच्छभारत अभियान पंधरवाडा राबविण्यात येवून दर्यापुर बसस्थानक रासेयोच्या वतीने स्वच्छ करण्यात आले. त्याच प्रमाणे स्वच्छतेची शपत विद्यार्थी व उपस्थितांना या प्रसंगी देयात आली.

दि. 14 / 08 / 2019

जिल्हा परिषद अमरावती स्वच्छ भारत मिशन व रासेयो च्या वतीने " स्वच्छ संकल्पसे स्वच्छ सिध्दी " या निबंध स्पर्धेचे आयोजन महाविद्यायलयत करण्यात येवून या निबंध स्पर्धेत रासेयोच्या 100 विद्यार्थीनींनी आभासी पध्दतीने आपला सहभाग नोंदवून कार्यक्रम यशस्वी पार पडला.

दि. 18 / 08 / 2019

आंतरराष्ट्रीय युवा दिनाच्या निमत्तीने जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालयअमरावती.,जिल्हा एड्स प्रतिबंधक व नियंत्रण कक्ष जिल्हा समान्य रूग्णालय,अमरावती तसेचदर्यापुर उपजिल्हा रूग्णालय व रासेयोच्या संयुत्क विद्यमाने कोराना जनजागृती या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाला मार्गदर्शक म्हणून श्री.डॉ.राहाटे(दर्यापुर ग्रमीण रूग्णालय ,दर्यापुर) यांनी मार्गदर्शन केले.

दि. 05 / 09 / 2019

डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन यांची जयंती शिक्षक दिन म्हणुन साजरी करण्यात आली. या प्रसंगी महाविद्यालातील विद्यार्थीनींनी आभासी पध्दतीने प्राध्यापकांना पुष्पगुच्छ देवून त्यांचा सत्कार केला.यावेळी प्राध्यांपकांनी शिक्षकांचे कार्य व दिशा या विषयावर आपली मते आभासी पध्दतीने व्यक्त केली.

दि. 24 / 09 / 2019

राष्ट्रीय सेवा योजना दिवस म्हणून सामाजिक जानिवेतून " स्वच्छते संदर्भा " महाविद्यालातील 50 मुलींना स्वच्छते संदर्भात आपले विचार आभासी पध्दतीने व्यक्त केले.

दि. 02 / 10 / 2019

महात्मा गांधी जयंती व लालबहादुर शास्त्री यांची जयंती महाविद्यालयात रासेयोच्या वतीने साजरी करण्यात आली.या प्रसंगी विद्यार्थीनींना आपले भाषणे आभासी पध्दतीने दिली.

दि. 15 / 10 / 2019

डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम जन्मदिना निमीत्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.हा दिवस वाचन व प्रेरणा दिन म्हणुन साजरा करण्यात आली. या प्रसंगी प्राचार्यडॉ.अविनाश चौखंडे.यांच्या मार्गदर्शनात ऑनलाइन वेविनार चे आयोजन करण्यात आले होते.प्रामुख वक्ते म्हणून रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. हरिदास आखरे यांनी मार्गदर्शन केले.

दि. 17 / 10 / 2019 20

स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी माय जॉब ॲकेडमी दर्यापुर व रासेयोच्या वतीने करण्यात आले होते.डॉ.देवलाल आठवले. यांनी विद्यार्थीनींना स्पर्धापरीक्षा विषयकमार्गदर्शन आभासी पध्दतीने या वेळी केले.

दि. 30 / 10 / 2019

सरदार पटेल यांची जयंती राष्ट्रीय एकता दिवस म्हणून साजरी करण्यात आली. निंगध स्पर्धा यावेळी घेण्यात आली. राष्ट्रीय एकतेची शपथ महाविद्यालयातील सर्व विद्यार्थीनींना रासेयोच्या वतीने देण्यात आली. कार्यक्रमाला डॉ.हरिदास आखरे., प्रा.डॉ.ज्योती हावरे. उपथित होत्या.

दि. 26 / 11 / 2019

संविधान दिना निमीत्त रासेयोच्या वतीने भारतीय संविधानाच्या उद्देश पत्रीकेचे वाचन आभासी पध्दतीने या प्रसंगी करण्यात आले. उद्दिष्टे या प्रसंगी सविस्तर मांडण्यात येवून विद्यार्थीनींना त्याचे महत्व पडवून देण्यात आले.

दि. 06 / 12 / 2019 20

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाह दिना निमीत्त महाविद्यालया कार्यक्रम आयोजीत करण्यात आला होतो. त्याप्रसंगी वकृत्व स्पर्धेचे आभासी पध्दतीने आयोजन करण्यात येवून डॉ.आंबेडकरांना आदरांजली वाहण्यात आली.

दि. 03 / 01 / 2020

महिला मुक्ती दिनाचे औचित्य साधुन सावित्रीबाई फुले जयंती साजरी करण्यात आली. या प्रसंगी प्रा.चंदा खंडारे यांनी सावित्रीबाईंच्या जीवन कार्यावर मार्गदर्शन केले

दि. 06 / 01 / 2020

सहस्त्रक मतदार नोंदणी कार्यक्रम राबविण्याम आली. 01 / 01 / 2020 रोजी ज्यांच्या वयाला 18 वर्ष पुर्ण झाली अशा सर्व विद्यार्थीनींची नोंद मतदार यादी करण्यात आली.

दि. 07 / 01 / 2020

मतदार साक्षरता क्लबची स्थापना रासेयोच्या वतीने करण्यात आली. त्या साक्षरता क्लब मध्ये महाविद्यालयातील विद्यार्थीनीं कु. रूपाली दहे ,कु.साक्षी सगणे ,कु.प्रियंका गावंडे यांची निवड करण्यात आली.

दि. 12 / 01 / 2020

स्वामी विवेकानंद जयंती निमीत्य राष्ट्रीय युवा दिवस तसेच राजमाता जीजाऊ यांची जयंती साजरी करण्यात आली. त्याप्रसंगी विद्यार्थीनींनी आभासी पध्दतीने आपले मनोगत व्यक्त केले.

दि. 25 / 01 / 2020

राष्ट्रीय मतदार दिवस साजरा करण्यात आला. याप्रसंगी महाविद्यालयातील विद्यार्थीनींनी मतदाररचे महत्व हे पटवून दिले.याप्रसंगी वकृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.या स्पर्धेत 22 मुलींना आपला सहभाग नोंदवून आपले विचार व्यक्त केले. दर्यापुर तहसिलच्या वतीने वकृत्व स्पर्धेत गुणानूक्रमे येणा–या विद्यार्थीनींना प्रशस्तिपत्राचे वाटप करण्यात आले.

दि. 30 / 01 / 2020

हुतात्मा दिनाचे औचित्य साधुन महात्मा गांधी यांच्या जीवन कार्यावर वत्कृत्व स्पर्धेचे आयोजन आभासी पध्दतीने करण्यात आले.

दि. 08 / 02 / 2020

लोकशाही पंधरवाडा साजरा करण्यात आला. लोकशाही निवडणूक व सुशासन या विषयावर महाविद्यालयात वत्कृत्व स्पर्धा,निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होत.रासेयोच्या वतीने महाविद्यालयातील अनेक विद्यार्थीनींनी या मध्ये आपला सळभाग नोंदवून वरिल विषयाच्या अनुषंगाने आपले विचार आभासी पध्दतीने व्यक्त केले.

दि. 19 / 02 / 2020

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती निमीत्य महाविद्यालयात शिवाजी महाराज यांच्या जीवन कार्यावर महाविद्यालयातील विद्यार्थीनींनी आभासी पध्दतीने यथोचित भाषणे करून शिवरायांना अभिवादन केले.

दि. 22 / 02 / 2020

नैसर्गिक आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण कार्यक्रम एन.डी.एफ. टिम तसेच दर्यापुर तहसिल कार्यालय व रासेयोच्या वतीने व्यवस्थापन प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. याप्रसंगी विद्यार्थीनींना आपत्ती व्यवस्थापनाचे धडे देण्यात आले.

दि. 23 / 02 / 2020

संत गाडगे बाबा यांच्या जयंती औचित्य साधुन दशसुीवर आधारीत कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयाच्या रासेयोच्या वतीने आयोजित करण्यात आले होते. त्या दशसुत्रीमधील प्रमुख्याने खालील कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यात आली. त्यामध्ये 1) ग्रामीन रूग्णालय दर्यापुर मध्य स्वच्छता करण्यात आली.2) प्रभात फेरी काढून गाडगेबाबांच्या मुलमंत्राची घोषना देण्यात आली.3) संत गाडगेबाबा मिशन मुंबई व्दारा संचालित गाडगेबाबा अनाथ आश्रम ,दय्रापुर या ठिकाणी रासेयोच्या स्वयंसेवकांनी आपआपल्या घरून आश्रमामधील अनाथ मुलांसोबत आस्वाद घेतला. 4 )महाविद्यालयात गाडगेबाबांच्या दशसुत्रीवर वत्कव स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. 5) वसूंधरा पर्यावरण रक्षणाची शपथ देण्यात आली.

दि. 08 / 03 / 2020

जागतिक महिला दिना निमीत्त तहसिल कार्यालय दर्यापुर व रासेयोच्या वतीने जागतीक महिला दिन साजरा करण्यात आला. नेहरू युवा केंन्द्र अमरावती व रासेयो विभाग संयुक्त विघमानाने ऑनलाईन व्याख्यानमाला आयोजित करण्यात त्यामध्ये स्नेहा बासुतकर समन्वक नेहरू युवा केंन्द्र अमरावती यांनी प्रास्तविक केले. तर व्याख्याते म्हणुन डॉहरिदास आखरे, ब्वंदा खंडारे , डॉ.गजानन हेरोळे,यांनी महिलांच्या प्रश्नावर आपले विचार व्यक्त केले. अशा प्रकारे सत्र 2019 -2020 मध्ये राष्ट्रीय सेवा योजना विभाग अंतर्गत विविध कार्यक्रमाचे आयोजन केले.

कार्यक्रम अधिकारी
राष्ट्रीय सेवा योजना
श्रीमती कोकिळाबाई गावंडे
महिला महाविद्यालय, दर्यापूर

*Principal*
*Dr. A. R. Choukhande*
*Smt. Kokilabai Gawande Mahila*
*Mahavidhyalay, Daryapur*